आपल्या बातम्या, आतल्या बातम्या...
आपलं महानगर | My महानगर.com
www.mymahanagar.com

# वाघ अभियांत्रिकीमध्ये उद्योगाभिमुख अभ्यासक्रम

**नाशिक ।** के. के. वाघ शिक्षण संस्थेच्या के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयामार्फत चार नवीन उद्योगाभिमुख अभ्यासक्रम सुरू करण्यात आले आहेत, अशी माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. के. एन. नांदूरकर यांनी पत्रकार परिषदेत दिली. या महाविद्यालयात विविध अभ्यासक्रमांना शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना कोणत्याही अतिरिक्त शुल्काशिवाय हे अभ्यासक्रम शिकण्याची संधी मिळणार आहे. विविध क्षेत्रातील तज्ज्ञांकडून हे अभ्यासक्रम तयार करण्यात आल्याचे संस्थेचे जनसंपर्क संचालक अजिंक्य वाघ यांनी यावेळी सांगितले.

इलेक्ट्रिकल अभियांत्रिकी विभागांतर्गत इंडस्ट्रियल ऑटोमेशन, रोबोटिक्स आणि मॅनेजमेंट विभागांतर्गत लीन मॅनेजमेंट, मेकॅनिकल अभियांत्रिकी विभागांतर्गत हीटिंग, व्हेंटिलेशन अँड एअर कंडिशनिंग आणि कॉम्प्युटर सायन्स विभागांतर्गत क्वांटम कम्प्युटिंग असे हे चार अभ्यासक्रम तयार करण्यात आले आहेत. त्या-त्या क्षेत्रातील तज्ज्ञांनी हे अभ्यासक्रम तयार केले असून, प्रोफेसर ऑफ प्रॅक्टिस या पदावर काम करणारे संबंधित क्षेत्रातील तज्ज्ञ विद्यार्थ्यांना हे अभ्यासक्रम शिकविणार आहेत.

तीन सत्रांचे (१८ महिने) हे अभ्यासक्रम असून, त्याचे १८ क्रेडिट्स विद्यार्थ्यांना मिळणार आहे. प्रत्येक अभ्यासक्रमासाठी ६० विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जाणार आहे. ज्या विभागांतर्गत कोर्स सुरू करण्यात आला आहे, त्या विभागातील विद्यार्थ्यांसह अन्य विभागातील विद्यार्थ्यांनाही यासाठी प्रवेश घेता येणार आहे.

Nashik Edition
Jun 21, 2025 Page No. 2
Powered by: erelego.com